# Criterion 3: Research, Innovation, And Extensions

## 3.4: Extension Activities

3.4.3: Number of extension and outreach programs conducted by the institution through organized forums including NSS/NCC with involvement of community during the last five years.

Indapur Taluka Shikshan Prasarak Mandal's

**ARTS, SCIENCE AND COMMERCE COLLEGE, INDAPUR**

*(Best College Awardee of S.P.P.U. Pune, 2014)*

*Affiliated to Savitribai Phule Pune University, Pune*

# Index



| Sr. No. | Name of the Document | Years | Page Numbers |
|---|---|---|---|
| 1. | Photographs and any other supporting document of relevance should have proper captions and dates. | 2022-23<br>2021-22<br>2020-21<br>2019-20<br>2018-19 | 1-25 |

पुरोगामी विचाराचे

# एकमत

## सॅनिटायझरचे वाटप



**श्रीपूर :** श्रीपुर (ता.माळशिरस) यमाईनगर मधील प्राध्यापक तानाजी कसबे व सोमनाथ पवार यांनी कोरोना संसर्ग रोखण्याच्या दृष्टीने परिसरातील नागरिकांच्या घरोघरी जाऊन सॅनीटायझरचे वाटप केले. तसेच फिजिकल डिस्टनचे पालन करून कोरोना प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने नागरिकांना समुपदेशन केले. यावेळी शहीद निवृत्ती नगर, यमाईनगर, यादववस्ती, खरातवस्ती, या परिसरात घरो घरी जाऊन सॅनीटायझरचे वाटप करण्यात आले. यासाठी प्रा.तानाजी कसबे, सोमनाथ पवार, दशरत मोहिते यांनी विशेष सहकार्य केले.

# Mask and Sanitizer Distribution 2019-20

# संचार

## श्रीपूरमध्ये घरोघरी मास्क वाटप



**श्रीपूर, दि. २९-** येथील शहीद निवृत्तीनगरमधील युवकांनी कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनेंतगर्त परिसरातील नागरिकांना घरोघरी जाऊन मास्कचे वितरण केले. तसेच सोशल डिस्टन्सिंगचे पालन करून कोरोनाला प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने नागरिकांना समुपदेशन करण्यात आले. यावेळी यमाईनगर, मांडवे वस्ती, साळुंखे वस्ती, यादव वस्ती, पिसाळ वस्ती, जाधव वस्ती, लाटे वस्ती, शिंदे वस्ती या परिसरात घरोघरी जाऊन मास्कचे वाटप झाले. यासाठी प्रा. तानाजी कसबे, दशरत मोहिते, राजू खराडे, नरसिंह साळुंखे, लक्ष्मण मोहिते, जितेंद्र खरात, सोमनाथ पवार, किरण कसबे, सचिन पवार, शुभम यादव यांनी सहकार्य केले.

पुढारी



इंदापूर महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नारायण शिरगावकर.

# ‘एक गुन्हा तुमचे आयुष्य उद्ध्वस्त करतो’

**इंदापूर : पुढारी वृत्तसेवा**

तंत्रज्ञानाचा योग्य वापर होणे आवश्यक आहे. आपण केलेल्या चुकीच्या वर्तणुकीमुळे आपले आर्थिक नुकसान होऊ शकते. तसेच, आपली बदनामी होऊ शकते. फेसबुकवर फोटो अपडेट करणे, कमेंट्स, प्रोफाईल यांसारख्या तंत्रज्ञानाच्या गोष्टी आत्मसात करून त्याचा गैरवापर होणार नाही याची दक्षता घ्यावी. गुन्हा किती क्षुल्लक आहे हे पाहिले जात नाही. एक गुन्हा तुमचे आयुष्य उद्ध्वस्त करू शकतो, असे मत बारामतीचे उपविभागीय पोलिस अधिकारी नारायण शिरगावकर यांनी व्यक्त केले.

इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय इंदापूर आणि विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सायबर क्राईम आणि सिक्युरिटी'वर शिरगावकर यांनी मार्गदर्शन केले.

इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव मुकुंद शहा, निरा-भीमा सहकारी साखर कारखान्याचे संचालक राजवर्धन पाटील, सहायक पोलिस निरीक्षक गणेश लोकरे, नायब तहसीलदार रविकांत बनसोड, उपप्राचार्य प्रा. नागनाथ ढवळे, शुभांगी खंडागळे, सुनीता माने, माधुरी लडकत महसूलचे लिपिक दामोदर राठोड उपस्थित होते. प्राचार्य डॉ. संजय चाकणे यांनी प्रास्ताविक केले. दरम्यान, नारायणदास रामदास हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढली. सूत्रसंचालन डॉ. तानाजी कसबे यांनी केले. आभार डॉ. शिवाजी वीर यांनी मानले.

My Gramin Edition
28 Jan, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

पुणे, शुक्रवार, १३ मार्च २०२० ४



इंदापूर :राज्यस्तरीय स्पर्धेत लोककला सादर करताना विद्यार्थी.

# इंदापूर महाविद्यालय लोकनृत्य स्पर्धेत प्रथम

इंदापूर, ता. १२ : इंदापूर महाविद्यालयात आयोजित राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धेत इंदापूर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाने प्रथम, बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने द्वितीय, तर काष्टी येथील परिक्रमा महाविद्यालयाने तृतीय क्रमांक पटकाविला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे विद्यार्थी विकास मंडळ तसेच इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने स्पर्धा घेण्यात आल्या. एकल लोकनृत्य स्पर्धेत पिंपरीतील महात्मा फुले महाविद्यालयाच्या भारती भालेकरने प्रथम, इंदापूर महाविद्यालयाच्या सुप्रिया खाडेने द्वितीय क्रमांक पटकाविला.

स्पर्धेचे उद्घाटन इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव मुकुंद शहा यांच्या हस्ते झाले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन सदस्य तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय चाकणे अध्यक्षस्थानी होते.

रेश्मा परीतेकर, रंजना चाकणे, प्रा. विशाल मोरे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. प्रा. फिरोज शेख यांनी सूत्रसंचालन केले. विद्यार्थी कल्याण मंडळाचे अधिकारी डॉ. तानाजी कसबे यांनी आभार मानले. लेफ्टनंट प्रा. बाळासाहेब काळे, प्रा. गौतम यादव, अभिमन्यू भंडलकर, प्रा. मयूर मखरे, प्रा. युवराज फाळके, प्रा. सागर गुजराथी, प्रा. गणेश आवारे, प्रा. रवींद्र साबळे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

# इंदापूर महाविद्यालयाच्या 'फ्लेमिंगो'स पुरस्कार

## सन्मानपत्र व १५ हजार रुपये रोख असे पुरस्काराचे स्वरुप




इंदापूर, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात संपन्न झालेल्या सन्मान सोहळ्यात सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षासाठी अव्यवसायिक विभागातील विद्यापीठस्तरीय प्रथम क्रमांकाचे पारितोषिक इंदापूर महाविद्यालयाच्या 'फ्लेमिंगो' या नियतकालिकास मिळाले. सन्मानपत्र व पंधरा हजार रुपये रोख असे पारितोषिकाचे स्वरुप आहे. याच समारंभात सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात शैक्षणिक धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करणारे महाविद्यालय म्हणून इंदापूर महाविद्यालयास पुणे जिल्हा ग्रामीण स्तरावरील पुरस्कार मिळाले. सन्मानपत्र व साडेसात हजार रुपये रोख असे पारितोषिकाचे स्वरुप आहे.

### अभिनंदन

कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते हे पुरस्कार देण्यात आले. 'फ्लेमिंगो'नियत कालिकाचे संपादक प्राचार्य डॉ. संजय चाकणे, कार्यकारी संपादक डॉ. राजाराम गावडे, डॉ. तानाजी कसबे, डॉ. बाळासाहेब काळे व दादा कांबळे यांनी पुरस्काराचा स्वीकार केला. प्र कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव, डॉ. प्रफुल्ल पवार, राजेश पांडे, डॉ. विलास उगले, डॉ.संतोष परचुरे आदि उपस्थित होते. महाविद्यालयाच्या यशाबद्दल इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील व संस्थेचे सर्व संचालक मंडळ यांनी सर्वांचे अभिनंदन केले.



इंदापूर : बस स्थानक येथे स्वच्छतेसाठी 'एक तारीख एक तास' उपक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी मान्यवर.

## इंदापुरात 'एक तारीख एक तास' उपक्रम

इंदापूर : इंदापूर बस स्थानक एका तासात स्वच्छ करण्यात आले. निमित्त होते स्वच्छतेसाठी 'एक तारीख एक तास' या उपक्रमाचे. रविवारी (ता. १) इंदापूर नगरपरिषदेच्या वतीने आयोजित केलेल्या स्वच्छता मोहिमेला चांगला प्रतिसाद मिळाला. या वेळी माजी नगराध्यक्षा अंकिता शहा, इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव मुकुंद शहा, नगरपरिषदेचे माजी गटनेते कैलास कदम, माजी नगरसेवक शेखर पाटील, मुख्याधिकारी रामराजे कापरे, स्वप्नील राऊत, सौरभ शिंदि, स्वप्नील सावंत, शकील सय्यद, हमीद आतार, सागर गानबोटे, ललेंद्र शिंदे, इंदापूर बस आगार प्रमुख हनुमंत गोसावी, स्थानक प्रमुख परशुराम भोसले, सहायक वाहतूक निरीक्षक संतोष चौगुले, इंदापूर पतंजली योग समितीचे सदस्य, इंदापूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे, प्रा. सुवर्णा जाधव, डॉ. तानाजी कसबे, प्रा. दिनेश जगताप, प्रा. पुरुषोत्तम साठे, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी कल्याण मंडळचे विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ

# इंदापुरात वाहतूक नियमांचे पोस्टर प्रदर्शन

इंदापूर, ता. २१ : इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या येथील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विद्यार्थी विकास मंडळ तसेच पुणे सोलापूर एक्स्प्रेस वे प्रायव्हेट लिमिटेड यांच्या वतीने वाहतूक नियमांचे पोस्टर प्रदर्शन झाले.



इंदापूर : पोस्टर प्रदर्शन पाहताना मान्यवर व विद्यार्थी.

माजी सहकारमंत्री तथा संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, उपाध्यक्ष पद्मा भोसले, सचिव मुकुंद शहा, प्राचार्य डॉ. संजय चाकणे, बारामती प्रादेशिक परिवहन अधिकारी जयवंत पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला.

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे इंदापूरचे समन्वयक व माजी सैनिक विलास गाढवे तसेच धनंजय कळमकर यांनी वाहतूक सुरक्षा व नियम यासंदर्भात १०० पोस्टर्स तयार केले. महाविद्यालयातील २ हजार हून अधिक विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रदर्शनाला हजेरी लावली. तसेच सुरक्षित वाहन चालविण्याचा संकल्प केला.

बारामती प्रादेशिक परिवहन अधिकारी जयवंत पोळ यांनी या वेळी विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम, हेल्मेटचा वापर, चारचाकीमध्ये सिटबेल्टचा वापर तसेच विमा इत्यादी बाबत मार्गदर्शन केले.

आरटीओचे प्रकाश मुळे यांनी वाहन चालवताना मोबाईलवर न बोलणे तसेच सेल्फी न काढता सुरक्षित वाहन चालवावे, असे सांगितले. तर उपनिरीक्षक शंकर मुठेकर म्हणाले, "खेड्यातील निरक्षर लोकांना रस्ता सुरक्षा व वाहतूक नियम यासंदर्भात साक्षर करणे गरजेचे आहे."

सरडेवाडी टोलनाक्याचे अधिकारी मुस्तफा शेख, पत्रकार काकासाहेब मांढरे या वेळी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. तानाजी कसबे यांनी केले. तर आभार प्रा. गौतम यादव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रा. फिरोज शेख, प्रा. मयूर मखरे, चेतन साठे यांनी प्रयत्न केले.

Pune, District-Today
22/01/2020 Page No. 5

# इंदापुर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाकडून वृक्षारोपण व शिक्षक दिन साजरा



इंदापुर/वार्ताहर : गणेश कांबळे

इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या येथील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात संस्थेच्या सर्व प्रशालेच्या मुख्याध्यापक, प्राचार्य, उपप्राचार्य यांच्या हस्ते वृक्षारोपण करून अनोख्या पद्धतीने शिक्षक दिन साजरा करण्यात आला महाराष्ट्र राज्याचे माजी संसदीय व सहकारमंत्री हर्षवर्धनजी पाटील, उपाध्यक्षा पद्मा भोसले यांच्या विचार प्रेरणेतून संस्थेचे सचिव मुकुंद शहा यांनी प्रशालेतील सर्व मुख्याध्यापक यांचा सत्कार करून महाविद्यालयाच्या परिसरात शिक्षकांच्या हस्ते वृक्षारोपण करून शिक्षक दिन साजरा केला.प्राचार्य डॉ.संजय चाकणे, ज्ञानदेव घोगरे, विकास फलफले, लहू जाडकर, पांडुरंग सूर्यवंशी, अर्जुन दोलतोडे, प्रा. नागनाथ ढवळे, आशा सर्जेराव, सुप्रिया अगरखेड, फौजिया शेख यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी संस्थेचे सचिव मुकुंद शहा, डॉ. तानाजी कसबे, तसेच महादेव गायकवाड सुभाष आवारे उपस्थित होते.

सकाळ

# इंदापूर महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त उपक्रम

इंदापूर, ता. २९ : इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय येथे राष्ट्रीय छात्र सेना, विद्यार्थी कल्याण मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिनाचे औचित्य साधत एकता फेरी, संविधान सामान्य ज्ञान परीक्षा, संविधान उद्देशिकेचे वाचन व व्याख्यानाचे आयोजन अशा विविध उपक्रमांनी संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष राज्याचे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, प्राचार्य डॉ. जीवन सरवदे, उपप्राचार्य प्रा. दत्तात्रेय गोळे यांच्या मार्गदर्शनाखाली संविधान सामान्य ज्ञान परीक्षा घेण्यात आली. संविधान प्रत अर्पण केलेल्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच, या वेळी उद्देशिकेचे वाचन करून संविधानाची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. त्यानंतर इंदापूर महाविद्यालय ते नगरपरिषद येथील छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करीत खडकपुरा ते इंदापूर महाविद्यालयापर्यंत विद्यार्थ्यांनी घोषणा देत एकता फेरी काढली.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विज्ञान विभाग प्रमुख डॉ. शिवाजी वीर, राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र साळुंखे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. तानाजी कसबे, डॉ. दिनेश जगताप, प्रा. प्रशांत साठे, प्रा. धनंजय माने, प्रा. सुवर्णा जाधव प्रयत्न केले.



इंदापूर : कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त काढण्यात आलेली एकता फेरी.

Pune, District-Today
30/11/2023 Page No. 6

---

जगतारा टाइम्स
संपादक : अहिरेश्वर जगन्नाथ जगताप : 9890006948
जगतारा टाइम्स बातमी // बातमी
दि ०३/०३/२०२३// वार-शुक्रवार
पुणे जिल्हा बातमी
पुणे www.jagtaratimes.com RNI NO. : MAHMAR/2021/82664

# इंदापूर महाविद्यालयातील फूड फेस्टिवलचे राजवर्धन पाटील यांनी केले उद्घाटन

## विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षक व पालकांचा देखील या उपक्रमात सहभाग असावा- राजवर्धन पाटील



इंदापूर ता ०३ (बातमीदार गणेश कांबळे) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे विद्यार्थी विकास मंडळ आणि इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय इंदापूर विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित फूड फेस्टिवलचे उद्घाटन निरा भिमा सहकारी साखर कारखान्याचे संचालक युवा नेते राजवर्धन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.राजवर्धन पाटील यांनी या उपक्रमाचे स्वागत करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या तसेच पुढील वर्षी यासारख्या उपक्रमांमधून विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षक आणि पालकांचा देखील सहभाग मोठा वाढावा अशी अपेक्षा व्यक्त केली.यावेळी बोलताना राजवर्धन पाटील म्हणाले की विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबर इतर कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे .तसेच या आधूनिक युगात पर्यटन व्यवसायाचा विकास व विस्तार वेगाने होत आहे . त्यामुळे फुड इंडस्ट्री या क्षेत्रात विद्यार्थ्यांना व्यवसायाच्या नविन संधी निर्माण होत आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक संस्था व त्यामध्ये राबविण्यात येणारे उपक्रम हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहेत असे त्यांनी सांगितले.या निमित्ताने छोट्या व्यवसायातून उद्योगाच्या प्रेरणा विकसित व्हाव्यात. विद्यार्थ्यांना व्यावसायिक अनुभव मिळावा यासाठी हे उपक्रम महत्त्वपूर्ण असल्याचे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे यांनी व्यक्त केले. या फूड फेस्टिवलमध्ये 59 स्टॉलधारक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला असून जवळपास 80 ते 90 हजार रुपयांची उलाढाल झाली असल्याची माहिती या उपक्रमाचे आयोजक विद्यार्थी विकास मंडळाचे समन्वयक डॉ. तानाजी कसबे यांनी दिली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडासंचालक डॉ. भरत भुजबळ यांनी केले.आभार डॉ. शिवाजी वीर यांनी मानले.

**नवभारत**

## समाज कल्याण अधिकारी की अपील

# योजनाओं के दस्तावेज जमा करें विद्यार्थी



■ **पुणे, (सं.)** विद्यार्थी और पेरेंट्स केंद्र और राज्य सरकार की विभिन्न योजनाओं के लिए किए जाने वाले आवेदनों के जरूरी दस्तावेज समय पर पेश करें, जिससे योजना को सफल बनाने में मदद होगी, कॉलेज के सभी विद्यार्थी सरकारी योजना का लाभ लेने के लिए प्रयास करें, यह अपील समाज कल्याण अधिकारी संतोष जाधव ने की है. समाज कल्याण विभाग और इंदापुर के कला, साइंस और कॉमर्स कॉलेज की ओर से आयोजित छात्रवृत्ति योजना और जाति सत्यापन प्रमाण पत्र प्रक्रिया विषय पर आयोजित संगोष्ठी में जाधव मार्गदर्शन कर रहे थे. इस मौके पर कॉलेज के प्राचार्य डॉ. जीवन सरवदे, साइंस विभाग प्रमुख डॉ. शिवाजी वीर, कला शाखा के प्रमुख डॉ. भिमाजी भोर, समान संधी केंद्र के प्रमुख डॉ. गजानन ढोबले, पी. हेलकर आदि उपस्थित थे. कार्यक्रम की जानकारी डॉ. गजानन ढोबले ने दी. कार्यक्रम का संचालन डॉ. तानाजी कसबे ने किया.

Pune-plus Edition
05-september-2023 Page No. 4
epaper.enavabharat.com

**लोकमत**

# महिलांना कायमच आदर, सन्मान मिळावा : अंकिता पाटील-ठाकरे

लोकमत न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** महिलांनी आत्मविश्वासाने प्रत्येक क्षेत्रात संधी निर्माण करणे आवश्यक आहे. आधुनिक युगामध्ये विज्ञान-तंत्रज्ञान, व्यापार, शिक्षण यासारख्या सर्वच क्षेत्रांमध्ये महिलांनी आघाडी घेतली आहे.

महिला दिन केवळ एकाच दिवसापुरता साजरा न होता वर्षभर महिलांना आदर व सन्मानाची वागणूक देणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, असे मत जिल्हा परिषद सदस्या अंकिता पाटील-ठाकरे यांनी व्यक्त केले.

कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय इंदापूर येथे मंगळवारी (दि. ८) आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात त्या

समाजातील समानता, बंधुता आणि एकात्मता या तत्वांना अनुसरून घटनात्मक तरतुदींच्या साहाय्याने महिलांनी आपले हक्क घेण्यासाठी सक्षम होणे काळाची गरज आहे. महिलांनी शिक्षणाच्या माध्यमातून आपली आर्थिक व सामाजिक प्रगती घडवून आणणे आवश्यक आहे, असे मत इंदापूर न्यायालयाच्या न्यायाधीश एस. डी. वडगावकर यांनी व्याख्यानादरम्यान व्यक्त केले.

बोलत होत्या.

प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय चाकणे यांनी केले. यावेळी त्यांनी आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे महत्त्व पटवून सांगितले. महिलांनी केवळ चूल आणि मूल यापुरतेच मर्यादित राहायचा काळ नसून शिक्षणाच्या जोरावर आपली वेगळी ओळख निर्माण करण्याची आवश्यकता आहे, असेही त्या म्हणाल्या. यावेळी उपप्राचार्य नागनाथ ढवळे, प्रा. विद्या गायकवाड, प्रा. मृदुल कांबळे, प्रा. दमयंती जाधव, प्रा. कल्पना अहिवळे, प्रा. सुवर्णा जाधव, प्रा. जयश्री सरवदे, प्रा. स्वाती राऊत, प्रा. शुभांगी कारंडे, प्रा. डॉ. मोना पाटील, प्रा. प्रांजली नलवडे, प्रा. सारिका पाटील, प्रा. दीक्षा बोगाणे, प्रा. निकम, प्रा. रूपाली मिसाळ, प्रा. पूजा भोसले, तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणात हजर होत्या. सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. तानाजी कसबे यांनी केले. आभार प्रा. मनीषा गायकवाड यांनी मानले.



इंदापूर येथील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

Hello Pune Gramin
Page No. 8 Mar 12, 2022
Powered by: erelego.com

सकाळ

# इंदापूर महाविद्यालयात फूड फेस्टिव्हलला उत्स्फूर्त प्रतिसाद

## शिक्षणाबरोबरच इतर कौशल्य आत्मसात करणे आवश्यक : डॉ. जीवन सरवदे


**इंदापूर :** फूड फेस्टिव्हलच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. जीवन सरवदे आणि इतर मान्यवर.

**इंदापूर, ता. १८ :** "आधुनिक काळात विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबर इतर कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे. तसेच आज पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी फूड इंडस्ट्रीचा विकास होणे गरजेचे आहे. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या क्षेत्राकडे वळणे आवश्यक आहे," असे प्रतिपादन इंदापूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे यांनी केले.

इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय इंदापूर येथे आयोजित फूड फेस्टिव्हलला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या वेळी महाविद्यालयीन युवकांनी फेस्टिव्हलमध्ये असलेल्या नवनवीन पदार्थांवर ताव मारला. यामध्ये तब्बल ५० हजार रुपयांहून अधिक आर्थिक उलाढाल झाली. या प्रसंगी प्राचार्य डॉ. सरवदे बोलत होते. येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये संस्थेचे हर्षवर्धन पाटील व सर्व संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली फूड फेस्टिवल हा उपक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सरवदे, डॉ. शिवाजी वीर, डॉ. भीमाजी भोर, डॉ. सदाशिव उबंरदंड, डॉ. प्रज्ञा लामतुरे (सांस्कृतिक विभाग प्रमुख) डॉ. तानाजी कसबे (विद्यार्थी विकास अधिकारी) महाविद्यालयातील विविध विभागाचे प्रमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ.तानाजी कसबे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रज्ञा लामतुरे यांनी फूड फेस्टिवल या उपक्रमाचा हेतू व उद्दिष्ट्ये सांगितली.

या उपक्रमातील पदार्थांचे परीक्षण प्रा. डॉ. गजानन ढोबळे, डॉ. राजाराम गावडे, प्रा. श्याम सतार्ले यांनी केले. डॉ. गावडे यांनी सूत्रसंचालन केले. या दरम्यान विविध विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. ५० हजारांहून अधिकची आर्थिक उलाढाल झाली. या उपक्रमात ६१ स्टॉल मध्ये बाजरीचे भरीत, कटलेट, कच्ची दाबेली, सिक्स्टी फाइव्ह, इडली-सांबर, दही धपाटे, स्पेशल झुणका भाकरी या व्यतिरिक्त पाणीपुरी, भेळ, बर्फगोळा, यांसारखे पदार्थांची विक्री विद्यार्थ्यांनी केली.

यातून ५० हजार रुपयांहून अधिकची आर्थिक उलाढाल झाली.

Pune, Baramati-Today
19/02/2024 Page No. 3

सकाळ

# युवकांसाठी शैक्षणिकबरोबरच आर्थिक साक्षरता महत्त्वाची

## राजवर्धन पाटील; इंदापूर महाविद्यालयात आर्थिक साक्षरता, गुंतवणुकीवर कार्यशाळा


**इंदापूर :** कार्यशाळेत युवकांना मार्गदर्शन करताना राजवर्धन पाटील.

**इंदापूर, ता. ७ :** "केवळ शैक्षणिक साक्षरता महत्त्वाची नसून युवकांनी शैक्षणिक साक्षरतेबरोबरच आर्थिक साक्षर झाले पाहिजे. विद्यार्थ्यांनी विद्यार्थी दशेतच आर्थिक साक्षर होऊन गुंतवणुकीचे नियोजन करावे," असा सल्ला इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक राजवर्धन पाटील यांनी केले.

नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सेक्युरिटी मार्केट (NISM), सेक्युरिटी एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (SEBI), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या शाहीर अमर शेख सभागृहामध्ये 'आर्थिक साक्षरता आणि गुंतवणूक' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी राजवर्धन पाटील बोलत होते. सेबीचे प्रशिक्षक डॉ. विजयकुमार ककडे यांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन केले.

या वेळी अर्थशास्त्राचे माजी विभाग प्रमुख प्रा. बी. जी. चव्हाण यांच्या स्मरणार्थ 'अर्थबोध' या अंकाचे प्रकाशन करण्यात आले. डॉ. सुवर्णा सूर्यवंशी, उपप्राचार्य प्रा. दत्तात्रेय गोळे, डॉ. प्रज्ञा लामतुरे या वेळी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना या कार्यशाळेचा भविष्यात चांगला उपयोग होईल. अनेक महाविद्यालयाने कार्यशाळेकरीता प्रस्ताव पाठविल्यानंतर फार कमी महाविद्यालयांना सेबीकडून आयोजनाची ही संधी प्राप्त होत असते. आपल्या महाविद्यालयाला ही संधी मिळाली त्याबद्दल डॉ. विजय ककडे यांनी अभिनंदन केले. या वेळी प्राचार्य डॉ. जीवन सरवदे, डॉ. शिवाजी वीर यांनीही मनोगत व्यक्त केले. अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. भीमाजी भोर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. तानाजी कसबे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. कार्यक्रमासाठी प्रा. अमोल थोरात, प्रा. अक्काबाई श्रीराम यांनी परिश्रम घेतले. प्रा. श्याम सातार्ले यांनी सूत्रसंचालन तर, प्रा. अमोल सरडे यांनी आभार मानले.

Pune, Baramati-Today
08/02/2024 Page No. 4

सकाळ

# महिला देशाच्या विकासाची दिशा ठरवितात : सुधीर पाडुळे

इंदापूर, ता. २५ : मुलांनी महाविद्यालयीन जीवनात अभ्यासाबरोबर इतर उपक्रमांमध्ये सहभाग घेऊन व्यक्तिमत्त्वाचा विकास करावा. तसेच, मुलींनी आपल्या स्वसंरक्षणासाठी आरोग्य जपले पाहिजे. आपल्या समस्या आपल्या आई-वडिलांबरोबरच शिक्षक वर्गाचे चर्चा करून सोडवल्या पाहिजेत. निर्भय व सक्षम महिला देशाच्या विकासाची दिशा ठरवितात. असे प्रतिपादन इंदापूर पोलिस स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक सुधीर पाडुळे यांनी केले.



इंदापूर : महाविद्यालय येथे निर्भय कन्या उपक्रमांतर्गत कार्यशाळेस उपस्थित मान्यवर.

इंदापूर महाविद्यालय येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे विद्यार्थी विकास मंडळ व कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय इंदापूर यांच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निर्भय कन्या अभियान या उपक्रमांतर्गत कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी पोलिस उपनिरीक्षक सुधीर पाडुळे बोलत होते.

या वेळी इंदापूर जिल्हा उपजिल्हा रुग्णालयातील डॉ. माधुरी चंदनशिवे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे, कला शाखाप्रमुख डॉ. भीमाजी भोर, विज्ञान शाखाप्रमुख डॉ. शिवाजी वीर आदी उपस्थित होते .

याप्रसंगी डॉ. माधुरी चंदनशिवे यांनी मुलींचे आरोग्य, समस्या व उपाय या विषयावर बोलताना विद्यार्थिनींना आरोग्य विषयक सविस्तर माहिती दिली. तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे यांनी मुलींनी आपल्या आई-वडिलांबरोबर मैत्रीपूर्ण संबंधातून आपल्याला निर्माण होणाऱ्या समस्यांचे निराकरण करावे असे सांगितले. तसेच, महाविद्यालयीन जीवनामध्ये शिक्षकांप्रति आदरभाव जपणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. क्रीडा संचालक डॉ. भरत भुजबळ यांनी योग, व्यायाम व खेळाचे महत्त्व विद्यार्थिनींना समजून सांगताना योग्य आहार व व्यायामामुळे व्यक्तिमत्त्व विकास होण्यास मदत होत असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. तानाजी कसबे यांनी केले. पाहुण्यांची ओळख डॉ. प्रज्ञा लामतुरे यांनी तर आभार प्रा. विद्या गायकवाड यांनी मानले. या वेळी विविध विभागाच्या प्रमुख व निर्भय समितीतील सदस्य व महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

Pune, Baramati-Today
26/01/2024 Page No. 7

**Year: -2022-23**





**Program of Tree Plantation 5 June 2022**





**Program of Tree Plantation 5 June 2022**



**Har Ghar Titnga 13-18-August 2022**



**Rangoli Competition 21 August 2022**







**Nirbhay Kanya Abhiyan 25Nov 2022**






**Sanvidhan Rally 26 Nov. 2022**







**Birth Ceremony Savitribai Phule 03 Jan. 2022**






**Campaign of Voters day 25 Jan 2022-23**







**Program of Food Festival   3 March 2022**







**International Women’s Day 08 March 2023**

# जगतारा टाइम्स

संपादक : अहिरेश्वर जगन्नाथ जगताप : 9890006948
जगतारा टाइम्स बातमी // बातमी
दि ०३/०३/२०२३// वार-शुक्रवार
पुणे जिल्हा बातमी
पुणे www.jagtaratimes.com RNI NO. : MAHMAR/2021/82664

## इंदापूर महाविद्यालयातील फूड फेस्टिवलचे राजवर्धन पाटील यांनी केले उद्घाटन

### विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षक व पालकांचा देखील या उपक्रमात सहभाग असावा- राजवर्धन पाटील



इंदापूर ता ०३ (बातमीदार गणेश कांबळे) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे विद्यार्थी विकास मंडळ आणि इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय इंदापूर विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित फूड फेस्टिवलचे उद्घाटन निरा भिमा सहकारी साखर कारखान्याचे संचालक युवा नेते राजवर्धन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.राजवर्धन पाटील यांनी या उपक्रमाचे स्वागत करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या तसेच पुढील वर्षी यासारख्या उपक्रमांमधून विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षक आणि पालकांचा देखील सहभाग मोठा वाढावा अशी अपेक्षा व्यक्त केली.यावेळी बोलताना राजवर्धन पाटील म्हणाले की विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबर इतर कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे .तसेच या आधूनिक युगात पर्यटन व्यवसायाचा विकास व विस्तार वेगाने होत आहे . त्यामुळे फुड इंडस्ट्री या क्षेत्रात विद्यार्थ्यांना व्यवसायाच्या नविन संधी निर्माण होत आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक संस्था व त्यामध्ये राबविण्यात येणारे उपक्रम हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहेत असे त्यांनी सांगितले.या निमित्ताने छोट्या व्यवसायातून उद्योगाच्या प्रेरणा विकसित व्हाव्यात. विद्यार्थ्यांना व्यावसायिक अनुभव मिळावा यासाठी हे उपक्रम महत्त्वपूर्ण असल्याचे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे यांनी व्यक्त केले. या फूड फेस्टिवलमध्ये 59 स्टॉलधारक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला असून जवळपास 80 ते 90 हजार रुपयांची उलाढाल झाली असल्याची माहिती या उपक्रमाचे आयोजक विद्यार्थी विकास मंडळाचे समन्वयक डॉ. तानाजी कसबे यांनी दिली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडासंचालक डॉ. भरत भुजबळ यांनी केले.आभार डॉ. शिवाजी वीर यांनी मानले.

**03 March 2023 Food Festival**

# लोकमत

## महिलांना कायमच आदर, सन्मान मिळावा : अंकिता पाटील-ठाकरे

लोकमत न्यूज नेटवर्क

इंदापूर : महिलांनी आत्मविश्वासाने प्रत्येक क्षेत्रात संधी निर्माण करणे आवश्यक आहे. आधुनिक युगामध्ये विज्ञान-तंत्रज्ञान, व्यापार, शिक्षण यासारख्या सर्वच क्षेत्रांमध्ये महिलांनी आघाडी घेतली आहे.

महिला दिन केवळ एकाच दिवसापुरता साजरा न होता वर्षभर महिलांना आदर व सन्मानाची वागणूक देणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, असे मत जिल्हा परिषद सदस्या अंकिता पाटील-ठाकरे यांनी व्यक्त केले.

कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय इंदापूर येथे मंगळवारी (दि. ८) आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात त्या

समाजातील समानता, बंधुता आणि एकात्मता या तत्त्वांना अनुसरून घटनात्मक तरतुदींच्या साहाय्याने महिलांनी आपले हक्क घेण्यासाठी सक्षम होणे काळाची गरज आहे. महिलांनी शिक्षणाच्या माध्यमातून आपली आर्थिक व सामाजिक प्रगती घडवून आणणे आवश्यक आहे, असे मत इंदापूर न्यायालयाच्या न्यायाधीश एस. डी. वडगावकर यांनी व्याख्यानादरम्यान व्यक्त केले.

बोलत होत्या.

प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय चाकणे यांनी केले. यावेळी त्यांनी आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे महत्त्व पटवून सांगितले. महिलांनी केवळ चूल आणि मूल यापुरतेच मर्यादित राहायचा काळ नसून शिक्षणाच्या जोरावर आपली वेगळी ओळख निर्माण करण्याची आवश्यकता आहे, असेही त्या म्हणाल्या. यावेळी उपप्राचार्य नागनाथ ढवळे, प्रा. विद्या गायकवाड, प्रा. मृदुल कांबळे, प्रा. दमयंती जाधव, प्रा. कल्पना अहिवळे, प्रा. सुवर्णा जाधव, प्रा. जयश्री सरवदे, प्रा. स्वाती राऊत, प्रा. शुभांगी कारंडे, प्रा. डॉ. मोन पाटील, प्रा. प्रांजली नलवडे, प्रा. सारिका पाटील, प्रा. दीक्षा बोगाणे, प्रा. निकम, प्रा. रूपाली मिसाळ, प्रा. पूज भोसले, तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणात हजर होत्या. सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. तानाजी कसबे यांनी केले. आभार प्रा. मनीष गायकवाड यांनी मानले.



इंदापूर येथील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

Hello Pune Gramin
Page No. 8 Mar 12, 2022
Powered by: erelego.com

**08 march 2022**

नवराष्ट्र

# 'आय कॉलेजची सांस्कृतिक भेट' कार्यक्रम उत्साहात



इंदापूर (वा.) शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांच्या सहभागाने इंदापूर महाविद्यालयात बहारदार स्वरुपात 'आय कॉलेजची सांस्कृतिक भेट' हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. नृत्य व माईम्स मध्ये राष्ट्रीय पारितोषिक मिळवणारी सुप्रिया खाडे, अभिनयात राष्ट्रीय पारितोषिक विजेते राहुल बिबे, अभिनयाबरोबर स्क्रिप्ट रायटिंग न्यूयॉर्कला निवड झालेला प्रशांत मखरे, 'जिवंत वाडा' या वेब सिरीजमधील किरण उघडे, वेब सिरिजचा निर्माता व हभप किर्तनकार कुमार शिंदे,'नापास कट्टा या वेब सिरीजमधील अभिनेता आशिष माने, मिमिक्री आर्टीस्ट व वेब सिरीज मधील संतोष नरूटे, वक्ता अक्षय खोचरे, नृत्य प्रकारात राज्यस्तरावर ख्याती मिळवणारा नर्तक रोहित शिंदे या माजी विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभागी होत आपले कलाविष्कार सादर केले. यावेळी डॉ. भिमाजी भोर, डॉ. शिवाजी वीर, डॉ. सदाशिव उंबरदंड, प्रा. धनंजय भोसले, डॉ. विद्या गायकवाड, डॉ. तानाजी कसबे, डॉ. बाळासाहेब काळे, डॉ.गजानन कदम, डॉ. संदिप शिंदे, प्रा. हर्षवर्धन सरडे, प्रा.थोरात, प्रा. सोमनाथ चव्हाण, प्रा. बोंगाणे, प्रा. स्वाती राऊत, प्रा. दीक्षा बोंगाणे व रासेयो विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते.

Pune Plus Edition
03 November 2022 Page No. 2
epaper.navarashtra.com

Year:-2019-20






Program of Tree Plantation 5 June 2022-23





Program of Yoga Day 21 June2019-20





Cleaning Campaign 01 October  2019-20




Nirbhay Kanya Abhiyan 25Nov 2019-20




Constitution Day 26 November 201-20




Disability Day 03December 2019-20







Program Welcome of New Year 1st January 2020





Skill of News Writing 06 Jan 2020







Lekhak Hotana 14 Jan 2020





Program of Food Festival 28 jan2019-20




Program of Road Safety 22 Jan 2019-20



सकाळ

# इंदापुरात वाहतूक नियमांचे पोस्टर प्रदर्शन

इंदापूर, ता. २१ : इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या येथील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विद्यार्थी विकास मंडळ तसेच पुणे सोलापूर एक्स्प्रेस वे प्रायव्हेट लिमिटेड यांच्या वतीने वाहतूक नियमांचे पोस्टर प्रदर्शन झाले.

माजी सहकारमंत्री तथा संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, उपाध्यक्ष पद्मा भोसले, सचिव मुकुंद शहा, प्राचार्य डॉ. संजय चाकणे, बारामती प्रादेशिक परिवहन अधिकारी जयवंत पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला.

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे इंदापूरचे समन्वयक व माजी सैनिक विलास गाढवे तसेच धनंजय कळमकर यांनी वाहतूक सुरक्षा व नियम यासंदर्भात १०० पोस्टर्स तयार केले. महाविद्यालयातील २ हजार हून अधिक विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रदर्शनाला हजेरी लावली. तसेच सुरक्षित वाहन चालविण्याचा संकल्प केला.

बारामती प्रादेशिक परिवहन अधिकारी जयवंत पोळ यांनी या वेळी विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम, हेल्मेटचा वापर, चारचाकीमध्ये सिटबेल्टचा वापर तसेच विमा इत्यादी बाबत मार्गदर्शन केले.

आरटीओचे प्रकाश मुळे यांनी वाहन चालवताना मोबाईलवर न बोलणे तसेच सेल्फी न काढता सुरक्षित वाहन चालवावे, असे सांगितले. तर उपनिरीक्षक शंकर मुठेकर म्हणाले, ''खेड्यातील निरक्षर लोकांना रस्ता सुरक्षा व वाहतूक नियम यासंदर्भात साक्षर करणे गरजेचे आहे.''

सरडेवाडी टोलनाक्याचे अधिकारी मुस्तफा शेख, पत्रकार काकासाहेब मांढरे या वेळी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. तानाजी कसबे यांनी केले. तर आभार प्रा. गौतम यादव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रा. फिरोज शेख, प्रा. मयूर मखरे, चेतन साठे यांनी प्रयत्न केले.

इंदापूर : पोस्टर प्रदर्शन पाहताना मान्यवर व विद्यार्थी.

Pune, District-Today
22/01/2020 Page No. 5

News Publiced In Sakal Nwes Paper




World Wetland Day 02 Februarys2020




Lecture on Role of Cooperative Movement (SPPU) 22 Feb -2019-20






State Level Dance Competition  06-07 March 2020



पुणे, शुक्रवार, १३ मार्च २०२० ४

इंदापूर :राज्यस्तरीय स्पर्धेत लोककला सादर करताना विद्यार्थी.

# इंदापूर महाविद्यालय लोकनृत्य स्पर्धेत प्रथम

इंदापूर, ता. १२ : इंदापूर महाविद्यालयात आयोजित राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धेत इंदापूर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाने प्रथम, बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने द्वितीय, तर काष्टी येथील परिक्रमा महाविद्यालयाने तृतीय क्रमांक पटकाविला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे विद्यार्थी विकास मंडळ तसेच इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने स्पर्धा घेण्यात आल्या. एकल लोकनृत्य स्पर्धेत पिंपरीतील महात्मा फुले महाविद्यालयाच्या भारती भालेकरने प्रथम, इंदापूर महाविद्यालयाच्या सुप्रिया खाडेने द्वितीय क्रमांक पटकाविला.

स्पर्धेचे उद्घाटन इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव मुकुंद शहा यांच्या हस्ते झाले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन सदस्य तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय चाकणे अध्यक्षस्थानी होते.

रेश्मा परीतेकर, रंजना चाकणे, प्रा. विशाल मोरे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. प्रा. फिरोज शेख यांनी सूत्रसंचालन केले. विद्यार्थी कल्याण मंडळाचे अधिकारी डॉ. तानाजी कसबे यांनी आभार मानले. लेफ्टनंट प्रा. बाळासाहेब काळे, प्रा. गौतम यादव, अभिमन्यू भंडलकर, प्रा. मयूर मखरे, प्रा. युवराज फाळके, प्रा. सागर गुजराथी, प्रा. गणेश आवारे, प्रा. रवींद्र साबळे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.





District Level Workshop Of NCC 10th march 2020



Nilimatai Pawar Gold Medal Winner Mrs.Harshad Barvoker 8th January 2020